## एप्रिल 2017 ते मार्च 2023 पर्यंत आमच्या कामाचा आढावा -

| | |
|---|---|
| जन जागृती आणि प्रशिक्षण सत्र | १,६१४ |
| सहभागी (बालक, पालक, शिक्षक, पोलीस, NGOS, CBOS इ.) | ६८,३३३ |
| पिडीत व कौटुंबिक सहकार्य, समुपदेशन आणि कायदेशीर समर्थनाद्वारे हाताळलेली एकूण प्रकरणे | ७१५ |
| बाल न्याय मंडळातील हाताळलेली एकूण प्रकरणे | ३६२ |
| बाल न्याय मंडळातील एकूण समुपदेशन सत्रे | ६९१ |

## बाल लैंगिक अत्याचार : वस्तुस्थिती आणि आकडेवारी

| | |
|---|---|
| ७ | बालकांवर दर तासाला भारतात बाल लैंगिक अत्याचार होतात |
| १६७ | बालकांवर दररोज भारतात बाल लैंगिक अत्याचार होतात |
| १६१ | बाल लैंगिक अत्याचाराची प्रकरणे पुण्यामध्ये दाखल |
| ७,५७२ | बाल लैंगिक अत्याचाराची प्रकरणे महाराष्ट्रात दाखल |

(स्रोत: राष्ट्रीय गुन्हे नोंद विभाग- NCRB, 2022)

## चला बाल सुरक्षेला प्राधान्य देऊ

## मुख्य कार्यालय

फाऊंडेशन फॉर चाईल्ड प्रोटेक्शन- मुस्कान
नूलकर वाडा, 893 सदाशिव पेठ, नागनाथ पारा जवळ,
पुणे-411030

**PMC हेल्पलाईन क्रमांक-**
**9689062202/9112299785**

## उपकार्यालय-1

फाऊंडेशन फॉर चाईल्ड प्रोटेक्शन- मुस्कान
यशोधाम अपार्टमेंट, फ्लॅट नं.2, सर्व्हे नंबर 92, पवना नगर वसाहत,चिंचवड, पुणे-411033

**PCMC हेल्पलाईन क्रमांक-9112299784**

## वेब साईट

www.foundationforchildprotection.in

## सोशल मिडिया

फेसबुक नाव:
मुस्कान इनिशिएटिव्ह

इंस्टाग्राम आयडी:
@muskaaninitiative

E mail:
muskaanforchildprotection@gmail.com

## देणगी देण्यासाठी मार्ग:

- तुमच्या कॅमेऱ्यातून QR कोड स्कॅन करा
- पेजच्या तळाशी असलेल्या देणगी पर्यायावर क्लिक करा

**आपण कुठेही बाल लैंगिक अत्याचार होताना पहिले, ऐकले किंवा संशय आल्यास, कृपया फाऊंडेशन फॉर चाईल्ड प्रोटेक्शन - मुस्कान शी संपर्क साधा.**

FOUNDATION FOR CHILD PROTECTION
Muskaan

## आम्ही बालकांच्या लैंगिक शोषणापासून संरक्षणासाठी काम करतो.

फाऊंडेशन फॉर चाईल्ड प्रोटेक्शन-मुस्कान ही संस्था सन 2000 साला पासून बाल लैंगिक अत्याचार (CSA) पिडीत बालकांना मदत करण्यासाठी कार्यरत आहे. मुस्कान हा पुण्यातील एकमेव उपक्रम आहे ज्याचे संपूर्ण लक्ष CSA च्या गंभीर समस्येवर आहे, ह्याची अंमलबजावणी करण्यासाठी बहुउद्देशीय दृष्टीकोनातून आम्ही काम करत आहोत. आमचे काम हे केवळ बालकांबरोबर नसून, सर्व संबंधित भागीधारांसोबत उदा.,पालक, नातेवाईक, शिक्षक, पोलिस, वकील आणि बाल संरक्षण संस्थान बरोबर सुद्धा आहे. आम्ही अनेक बाल संगोपन संस्थान (CCIs) मध्ये राहणाऱ्या काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसोबत तसेच निरीक्षण गृहातील विधी संघर्ष ग्रस्त बालकांसोबतही त्यांचे हरवलेले बालपण आणि पुनर्वसन साठी काम करतो .

## आमचे उद्दिष्ट

लैंगिक शोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी बालकांना आणि प्रौढांना सशक्त बनविणे व बाल लैंगिक अत्याचार मुक्त समाज निर्माण करणाच्या प्रयत्न करणे.

## आमचे ध्येय

- सर्व बालकांना सुरक्षिततेचा हक्क व सुरक्षित वातावरण मिळवून देणे.
- बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण व प्रतिष्ठेच्या रक्षणासाठी त्यांच्या व्यक्तिमत्व जाणीव करून देणे.
- बालकांना सुरक्षित वातावरण प्रदान करण्यासाठी प्रौढांना प्रोत्साहित करणे.

**फाऊंडेशन फॉर चाईल्ड प्रोटेक्शन - मुस्कान ही एक नोंदणीकृत संस्था आहे आणि देणगीदारांना 80G चे फायदे मिळतात.**

# आम्ही बहुउद्देशीय दृष्टीकोन वापरून CSA पिडीत बालकांना मदत करतो

01

## प्रतिबंधक कार्य

आम्ही बालकांना, पालकांना, शिक्षकांना आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांना बाललैंगिक अत्याचाराची लक्षणे ओळखण्यासाठी आणि गैरवर्तन थांबवण्यासाठी आमच्या सत्रांद्वारे जागरूक करतो.पिडीत बालकांसोबत काम करताना सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी बालकांसोबत काम करणाऱ्या यंत्रणा जसे की पोलीस यांना POCSO कायद्याचे विशेष प्रशिक्षण देतो .

02

## कौटुंबिक सहकार्य

आमचे केस वर्कर प्रथम खबर अहवाल दाखल करण्यात सहकार्य करतात तसेच बालकांना पोलीस आणि कोर्ट प्रक्रियेदरम्यान मानसिक, शारीरिक आधार देतात. वैद्यकीय प्रक्रियेदरम्यान पालकांसह हॉस्पिटलला भेट,त्याचप्रमाणे शासकीय योजनानबद्दल मार्गदर्शन व मिळवण्यासाठी सहकार्य करतो.तसेच गृहभेटी करून व फोनद्वारे पिडीत बालकांना दीर्घकालीन मदत करतो .

03

## समुपदेशन

आम्ही बाल मानसशास्त्रज्ञ व समुपदेशकांच्या सल्ल्याने पिडीत बालकांना मानसिक धक्यातून बाहेर पडण्यासाठी मदत करतो व बालकांच्या आत्मसन्मानाची पुनर्बांधणी करण्यासाठी मदत करतो.

04

## पोलिसांना सहकार्य

आमचे समाजसेवक तपास अधिकारी यांना बालकांचे जबाब नोंदविण्यासाठी आणि POCSO कायद्यांतर्गत योग्य कलमे लावण्यासाठी मदत करतात. या संपूर्ण प्रक्रिये मध्ये आम्ही खात्री करतो की पीडितांचा आदर केला जाईल आणि तपास संपूर्णपणे पीडितांसाठी अनुकूल राहील.

05

## मोफत कायदेशीर मदत

आमच्या संस्थेअंतर्गत कार्यरत वकील, केसचा निर्णय होईपर्यंत पीडितांना मोफत कायदेशीर सहाय्य देतात. ते पीडितांना न्यायालयात हजर राहण्यासाठी आणि खटले हाताळण्यासाठी सरकारी वकिलांना मदत करतात.

06

## उपचारात्मक सेवा

आम्ही पिडीत बालकांना मानसिक आघातातून बाहेर पडण्यासाठी समुपदेशन, जीवन कौशल्ये आणि कला-आधारित उपक्रम राबवतो . विधी संघर्षग्रस्त बालकांना पुन्हा गुन्हे करण्यापासून रोखणे आणि मुख्य समाज प्रवाहात परत आणण्यासाठी कार्य करतो.

07

## समुदाय हस्तक्षेप

आम्ही वेगवेगळ्या पद्धती जसे की पथनाट्य,चित्रपट, पपेट शो च्या माध्यमातून बाल लैंगिक अत्याचार (CSA) रोखण्यासाठी वस्त्यांमध्ये लोकांना जागरूक करतो.

# आमच्या कामाची झलक

पिडीत बालकांना मोफत कायदेशीर मदत



बालकांसह जनजागृती सत्र



कौटुंबिक सहकार्य



पालकांसह जनजागृती सत्र



बाल संगोपन संस्था येथे विविध उपक्रम



पोलिसांसोबत प्रशिक्षण



विधी संघर्षग्रस्त बालकांसोबत क्रीडा उपक्रम



पथनाट्यांद्वारे जनजागृती




## आमच्या देणगीदारांचे आभार

VILLOO POONAWALLA FOUNDATION · bitwise foundation · Gera Let's Outdo · EATON Powering Business Worldwide · BAJAJ FINSERV · YARDI · BELLWETHER Valuing Tomorrow